श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जुलै २०२४ | वर्ष – १२ अंक – ७ | मासिक, पाने १२ | Regn. No. - MAHMAR/2022/86035

## श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या इंग्रजी माध्यम प्रशालेत 'Robotics and Artificial Intelligence Lab' चे उद्घाटन




*उद्घाटन करताना मा. श्री. विनय सहस्रबुद्धे, श्री. विकासराव वालावलकर, श्री. अभिजित सहस्रबुद्धे, सौ. शरयू यशवंतराव, श्री. कृष्णमूर्ती आणि अध्यापकवर्ग*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स डेरवण, सावर्डे या प्रशालेमध्ये दिनांक ०१ जुलै २०२४ रोजी AI, ROBOTICS, IOT, CODING, AR अशा अत्याधुनिक अभ्यासक्रमाने युक्त असणाऱ्या प्राथमिक आणि माध्यमिक दोन्ही विभागांच्या Robotics and Artificial Intelligence लॅबचे उद्घाटन राज्यसभेचे माजी खासदार व भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष मा. डॉ. विनयजी सहस्रबुद्धे यांच्या हस्ते करण्यात आले. Robotics and Artificial Intelligence लॅबच्या उद्घाटनाने संस्थेच्या शिक्षण क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला आहे. SKAI Roboticsचे डायरेक्टर श्री. अभिजित सहस्रबुद्धे आणि श्री. कृष्णमूर्ती यांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम इ. १ली ते १०वी करिता २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येत आहे.

Robotics and Artificial Intelligence लॅबच्या उद्घाटनानंतर उपस्थितांना लॅबमध्ये उपलब्ध असणारी अत्याधुनिक उपकरणे, विविध प्रकारचे रोबोट्स, थ्रीडी प्रिंटर, रोबोटिक किट्स, प्रगत संगणक प्रणाली, इत्यादींची सफर घडवण्यात आली. त्यानंतर शाळेमधील कार्यान्वित असणाऱ्या अटल टिंकरिंग लॅब, स्पेस लॅब आणि कला दालनाला डॉ. विनयजी सहस्रबुद्धे यांनी भेट दिली, विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि ग्रामीण भागात असूनही या शाळेच्या विकसित भारत बनविण्याच्या दूरदृष्टीबद्दल समाधान व्यक्त केले.

उद्घाटन सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सौ. सोनाली जोशी यांनी प्रमुख पाहुणे डॉ. विनयजी सहस्रबुद्धे यांची ओळख करून दिली. प्रास्ताविकामध्ये शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी २६ वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना




*प्रमुख पाहुणे मा. श्री. विनय सहस्रबुद्धे यांच्या हस्ते दीप-प्रज्वलन, सोबत श्री. विकासराव वालावलकर, श्री. अभिजित सहस्रबुद्धे*

उच्च शिक्षणासाठी सक्षम करणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेची स्थापना व त्यातून साकारत गेलेली अत्याधुनिक शाळा हा प्रवास उलगडला. यानंतर SKAI Roboticsचे डायरेक्टर श्री. कृष्णमूर्ती यांनी तंत्रज्ञान आणि नावीन्याच्या प्रवासात महत्त्वपूर्ण टप्पा ठरणाऱ्या ए आय आणि रोबोटिक्सविषयी आपले मत व्यक्त केले. याप्रसंगी झाडाची गोड फळे खायची असतील तर फळांवर लक्ष न ठेवता त्याच्या मुळांवर लक्ष देणे गरजेचे आहे यासाठीच कोकणासारख्या भागात हा अभ्यासक्रम मराठी भाषेतूनही राबवण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत हे नमूद केले. स्वाध्याय पुस्तिकेचे अनावरणही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

स्पर्धात्मक जगात वावरताना ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे हे गरजेचे असते आणि तंत्रज्ञानात झपाट्याने प्रगती करणाऱ्या २१व्या शतकातील आव्हाने पेलणारे विद्यार्थी तयार करण्यासाठी Robotics and Artificial Intelligence लॅब निर्माण करीत आहोत असे मत





*मा. श्री. विनय सहस्रबुद्धे यांचा श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते सत्कार*



*मा. श्री. विनय सहस्रबुद्धे स्पेस-लॅबमधील मॉडेल पाहताना*




*प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वाध्याय पुस्तिकेचे अनावरण*




*मा. श्री. विनय सहस्रबुद्धे श्रोतृवृंदाला संबोधित करताना*

संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी श्री. विकासराव वालावलकर यांनी व्यक्त केले.

विद्यार्थी व पालक यांना संबोधताना मा. डॉ. विनयजी सहस्रबुद्धे म्हणाले, भाषा ही संस्कृतीची वाहक आहे, त्यामुळे आधुनिकतेशी नाते जोडताना भाषा ही तितकीच महत्त्वाची ठरते. परदेशी तंत्रज्ञान आपण स्वदेशीला अनुकूल करून घेतले पाहिजे, तसेच संगणकाशी मैत्री करताना ग्रंथांशी असणारे आपले नाते तोडू नये असे सांगून वाचनाचे महत्त्व याप्रसंगी व्यक्त केले. कविश्रेष्ठ गुलजार यांच्या 'किताबें' या कवितेने त्यांनी आपल्या भाषणाची सांगता केली.


या उद्घाटन कार्यक्रमास संस्थेतील विविध विभागांचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, पालक, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अश्विनी खांडेकर यांनी केले व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्राजक्ता चाळके यांनी सर्वांचे आभार मानले. वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.सर्व उपक्रम पाहून डॉ. विनयजी सहस्रबुद्धे यांनी, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या PURA म्हणजेच 'Provision of Urban Amenities to Rural Areas' या संकल्पनेतील शाळा पाहून संस्मरणीय अनुभव मिळाला असे आनंदाने व्यक्त केले.

# अस्थिशल्यचिकित्सक डॉक्टर सुनील नाडकर्णी यांचा तीन वैद्यकीय पेटंट्स मिळाल्याबद्दल डेरवण रुग्णालयातर्फे सत्कार




*डॉ. नाडकर्णी यांचा सत्कार करताना डावीकडून डीन डॉ. मानसिंग घाडगे, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. सुनील नाडकर्णी आणि डॉ. नेताजी पाटील*

भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात गेली अनेक वर्षे डॉक्टर सुनील नाडकर्णी, MS (Orth), FRCS, MCh हे कार्यरत आहेत. चौदा वर्षे इंग्लंडमध्ये रुग्णसेवा केल्यानंतर ते देशात परत आले आणि तेव्हापासून पुण्यात अस्थिशल्य विशारद म्हणून कार्यरत आहेत. मणक्यांचे विकार हे त्यांचे विशेष अभ्यासाचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात त्यांचे सतत संशोधन सुरू असते. कोकणातील गोरगरीब रुग्णांना आपल्या ज्ञानाचा लाभ मिळावा म्हणून ते प्रत्येक आठवड्याच्या शेवटी डेरवणला येऊन रुग्णांवर उपचार करीत असतात. चिंतनशील स्वभावामुळे आपल्या क्षेत्रात सतत संशोधन करून उपचारपद्धतीत नवनव्या कल्पनांवर संशोधन करून रुग्णांना व्याधिमुक्त करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. पाठ दुखी आणि मणक्याचे आजार असलेल्या रुग्णांना आराम मिळावा म्हणून ताठ बसण्यासाठी आणि मणका सरळ राहावा म्हणून "An Upright Postural Aid" तसेच बिनटाक्याची मणक्यावरील शस्त्रक्रिया कारण्याकरता दिशादर्शक यंत्र ( A Generalised Path Guidance Tool to assist in Minimum Invasive Surgery of Lumbar Spine) आणि मणक्यातील पेशी प्रयोगशाळेत नव्याने निर्माण करण्याचे तंत्रज्ञान A Composition and Method for in Vitro Proliferation of Disc Cells ह्याकरता त्यांनी तीन पेटंट्स संपादन केली आहेत. या सर्व संशोधनात्मक कामात त्यांना सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉक्टर ऋता मुल्हेरकर आणि त्यांची टीम यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. तसेच या कामात वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयातील अस्थिरोग विभागाचेही योगदान महत्त्वाचे आहे. डॉक्टर नाडकर्णी यांच्या ह्या यशाप्रीत्यर्थ डेरवण रुग्णालयाच्या संचालिका डॉक्टर सुवर्णा पाटील, डेरवण वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉक्टर मानसिंग घाडगे, डॉक्टर नेताजी पाटील आदींनी त्यांचा अनौपचारिक असा सत्कार करून या तपस्वी आणि प्रसिद्धिपराङ्मुख अशा शल्यविशारदाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.




*राज्यसभेचे माजी खासदार व भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष मा. श्री. विनय सहस्रबुद्धे यांनी नोंदविलेला अभिप्राय*

# डेरवण प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




*प्रमुख पाहुण्या डॉ. आसावरी ढवळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना*

चिपळूण तालुक्यातील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, सावर्डे या शाळेने सीबीएसई बोर्डाच्या इ. दहावी व बारावीच्या शालांत परीक्षेत उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. संस्थेच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव समारंभ आयोजित करून घवघवीत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्याला भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई येथे वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. आसावरी ढवळे प्रमुख पाहुण्या लाभल्या.

माध्यमिक शालांत परीक्षेत तन्मय भंडारी यांने ९७.४०% गुण मिळवून प्रशालेत प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. तसेच त्याने गणित, संस्कृत व सामाजिक शास्त्र या तीन विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण प्राप्त केले आहेत. तन्मयला प्रथम क्रमांकासाठी विविध पारितोषिके मिळून रोख रु. १८७५०/- रकमेच्या बक्षिसाने गौरविण्यात आले.

शाळेत ९७.२०% गुण प्राप्त करून मुलींमध्ये पहिला क्रमांक संपादित केलेल्या श्रावणी राजेशिर्के या विद्यार्थिनीला विविध पारितोषिके मिळून रोख रु. २४२५०/- रकमेची बक्षिसे प्रदान करण्यात आली.

प्रशालेतील सासवी मिश्रा या विद्यार्थिनीने ९५.४०% गुण प्राप्त करून मुलींमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याप्रीत्यर्थ तिला पारितोषिक रु. ३५००/-ने गौरविण्यात आले. इंग्रजी विषयात सर्वाधिक ९५ गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थिनी श्रावणी राजेशिर्के व सासवी मिश्रा यांना विभागून रोख रु. १४०००/- पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. संस्कृत विषयात तन्मय भंडारी, श्रावणी राजेशिर्के, स्वरूपा हेंबाडे, वेद वारे व सृष्टी तेटांबे या पाच विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. या विद्यार्थ्यांना विभागून रोख रु. ८६५०/- पारितोषिकाने गौरविण्यात आले. हिंदी विषयात सर्वाधिक ९८ गुण प्राप्त केलेला विद्यार्थी रुद्रसिंह यादव याला रोख रु. ८०००/- रकमेचे बक्षिस प्रदान करण्यात आले.

गणित व सामाजिक शास्त्र विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त करून अव्वल ठरलेला विद्यार्थी तन्मय भंडारी याला गणितासाठी रोख रु. ११९५०/- व सामाजिक शास्त्रासाठी रु. ७०००/- पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. तसेच विज्ञान विषयात सर्वाधिक ९५ गुण मिळविणाऱ्या श्रावणी राजेशिर्के या विद्यार्थिनीला पारितोषिक रु. ८०००/-ने गौरविण्यात आले.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत विद्यालयातून ९१.६०% गुण मिळवून प्रथम आलेला विद्यार्थी मोहम्मद हादी सलीम काझी, द्वितीय क्रमांक अनामेय देवरुखकर ८८.६०% आणि तृतीय क्रमांक ऋचा शेंबेकर व अंजली सुरेश ८२.२०% या विद्यार्थ्यांना प्रशालेतर्फे रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांनी व पालकांनी



*श्रावणी राजेशिर्के सत्कार स्वीकारताना*




*सासवी मिश्रा शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना*

आपल्या मनोगताद्वारे शाळेबद्दल कृतज्ञता व सत्काराबद्दल आभार व्यक्त केले.

यावेळी प्रमुख पाहुण्या डॉ. आसावरी ढवळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, सातत्याने कष्ट केल्याशिवाय यशाची पायरी गाठता येत नाही. विद्यार्थ्यांनी चौकस बुद्धीने अभ्यास करावा; शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे व यशाने हुरळून न जाता पुढील शैक्षणिक प्रगती साधावी. पालकांनीही विद्यार्थ्यांचा कल विचारात घेऊन त्यांना प्रोत्साहन द्यावे. विद्यार्थ्यांचा ओढा हा आय.टी. किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स अशा नवीन तंत्रज्ञानाकडे जास्त असतो. विज्ञान, गणित आणि कला या शाखा समान महत्वाच्या आहेत, असे त्यांनी सांगितले. त्यावर उदाहरण म्हणून त्यांनी वैज्ञानिक आईन्स्टाईन आणि विख्यात इंग्रजी कवी विलियम वर्डस्वर्थ यांचं उदाहरण दिलं. या दोन्ही महान व्यक्तींचा बुद्ध्यांक सारखाच म्हणजे १५० होता असे एका परीक्षणात आढळून आले. त्यामुळे कुठल्याही शाखेला कधीच कमी लेखू नये असे त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांनी देशाचा गौरव वाढेल अशी कामगिरी करावी व एक चांगला माणूस म्हणून पुढे नावारूपाला यावं असे सांगून त्यांनी पुन्हा यशस्वितांचे अभिनंदन केले.




*स्वरूपा हेंबाडे शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना*




*मोहम्मद हादी शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना*

# विद्यार्थ्यांनी घेतला कलात्मक नवनिर्मितीचा आनंद !

‘‘पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवील; पण कलेशी जडलेली मैत्री तुम्ही का जगायचं हे सांगून जाईल!’’ असा मौलिक सल्ला पु. ल. देशपांडे देऊन गेले. आयुष्याला समृद्ध, रंगीत आणि आनंदी करण्याची गुरुकिल्ली म्हणजे कला होय ! अवगत असलेल्या वेगवेगळ्या कलांचा करिअरमध्ये वापर करून आपण आपल्या करिअरला नवी दिशा देऊ शकतो तसेच अंगभूत कलेचे व्यवसायात रूपांतर करू शकतो.

कलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा विकास करणे आणि त्यांची शैक्षणिक प्रगती साधण्याच्या हेतूने दरवर्षी जूनच्या पहिल्या पंधरवड्यात डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत कला कार्यशाळा घेतली जाते. या वर्षीदेखील कला कार्यानुभवाचा भरगच्च कार्यक्रम इ. १ली ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला.

प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांना रेखाटन व रंगकाम, कोलाज,

थम्ब आर्ट (बोटांच्या प्रिंट), वारली कला, घडी चित्रे, बाहुली काम, शाडूच्या मातीपासून फळे – फळभाज्या – प्राणी तसेच भेटकार्ड, भित्तिचित्रे, कागदी फुले, मोझाइक आर्ट, अशा अनेक कलाकृती शिकवल्या आणि विद्यार्थ्यांना स्वहस्ते नवनिर्मितीचा आनंद देण्यात आला. नृत्य विशारद शिक्षिका कु. शर्वरी अवसरे यांनी विद्यार्थ्यांना नृत्यकलेचं प्रशिक्षण दिलं.

माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांसाठी रेखाटन व रंगकामाबरोबरच आकाश कंदील, मधुबनी कला, मंडाला, कागदावर मोनो प्रिंट घेऊन त्यापासून लहान मोठ्या आकारांमध्ये कागदी पिशव्या, थीमनुसार पोस्टर्स, शाडू मातीचे गणपती, टाकाऊ पुठ्ठ्यापासून फुलदाणी, अंगाचा साबण, हॅन्ड वॉश, मेणबत्ती, पणत्यांचे सुशोभीकरण, वॉलपीस, इत्यादी विविध कलाप्रकार शिकवण्यात आले.

या कला-कार्यानुभव शिबिरात विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन लाभते तसेच वैज्ञानिक, ऐतिहासिक व्याख्यानेही आयोजित केली जातात.मेजर आर्चीस सबनीस यांनी सैन्य दलातील नोकरीच्या विविध संधींची विस्तृत माहिती देताना वय, शिक्षण, भाषिक ज्ञान, विविध आव्हाने तसेच मान सन्मान, फायदे याविषयी सविस्तर माहिती दिली.

सातारा येथील तबला विशारद श्री. शंकर चव्हाण यांनी इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना तबला वादन शिकवले. यात तबल्याच्या विविध भागांची नावे, वाद्य वाजवताना आवश्यक असलेली हातांची ठेवण, वाजवण्याची तसेच बसण्याची पद्धत व ठेका धरण्याचे प्राथमिक प्रशिक्षण दिले. तबला वादनाची आवड असलेल्या मुलांसाठी हे प्रशिक्षण पुढेही देण्यात येणार आहे.

३५०व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याविषयी थोर इतिहास तज्ज्ञ श्री. पांडुरंग बलकवडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. राज्याभिषेक करून घेण्यामागची महाराजांची भूमिका स्पष्ट करताना, स्वराज्य दृढपणे प्रस्थापित झाले हे सर्वांना कळावे, स्वराज्याला बळकटी मिळावी, इतर राज्यकर्त्यांनी त्याची दखल घ्यावी, प्रजेला एक सार्वभौम राजा असणे गरजेचे असल्याने महाराजांनी राज्याभिषेकाला मान्यता दिल्याचे श्री. बलकवडे यांनी नमूद केले. काशीतील विद्वत प्रचूर गागाभट्ट व अनेक ब्रह्मवृंदांसह महाराजांवर मंत्राभिषेक करण्यात आल्याचे सांगून सोहळ्याची तयारी व भव्यतेचे वर्णन केले. एक हिंदू राजा छत्रपती झाल्याने शत्रू राज्यकर्त्यांच्या झालेल्या मनोवस्थेचे विस्तृत विवेचन करून राज्याभिषेकाचे महत्त्व आपल्या व्याख्यानातून विशद केले.

श्री. दिलीप व सौ. दर्शना ठकार यांनी शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती व विविध प्राणी बनविण्याचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना दिले. रेखीव गणेश मूर्ती साकारण्यात विद्यार्थी तल्लीन झाले व पहिल्याच प्रयत्नात सुबक मूर्ती घडविण्याचा आनंद घेतला.

'प्रज्ञाज क्रिएशन' नावाने स्वतःचा हस्तकला वस्तूंचा ब्रँड असलेल्या यशस्वी हॉबी-आर्टिस्ट सौ. प्रज्ञा शिंत्रे ज्यांनी तयार केलेल्या शोभिवंत वस्तू देश-परदेशात विकल्या जातात अशा कलाकारांच्या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांना मिळाला. मुलांनी आकर्षक वॉलपीस आणि लिप्पण आर्टपासून फोटोफ्रेम तयार केल्या. विद्यार्थ्यांना शिकण्याची आवड असल्याचे सौ. प्रज्ञा शिंत्रे यांनी आवर्जून नमूद केले.

कलात्मक क्रियाकलापांमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना बहुआयामी शैक्षणिक अनुभव मिळतात, भावनिक अभिव्यक्तीला आणि कल्पनाशक्तीला प्रोत्साहन मिळते, स्वनिर्मितीचा आनंद आणि समाधान मिळते, चौकटीबाहेर विचार करण्याची संधी मिळते आणि अध्ययन कार्यही सुधारते.

या कार्यशाळेसाठी लागणारे सर्व साहित्य व तज्ज्ञ मार्गदर्शक, इ. खर्चाची जबाबदारी शाळा उचलते. विद्यार्थ्यांनी केवळ आपली कला वापरून नवनिर्मितीचा आत्मविश्वास संपादन करायचा असतो.







*प्रसिद्ध इतिहाससंशोधक श्री. पांडुरंग बलकावडे – श्रीशिवराज्याभिषेकवर्णन*



*मे. आर्चीस सबनीस – सैन्य दलातील नोकरीच्या विविध संधींची माहिती*



*सौ. प्रज्ञा शिंत्रे – आकर्षक वॉलपीस आणि लिप्पण आर्टपासून फोटोफ्रेम*



*तबला विशारद श्री. शंकर चव्हाण – वाद्याची माहिती देताना*




*नृत्य विशारद कु. शर्वरी अवसरे – विद्यार्थ्यांना नृत्यकलेचं प्रशिक्षण*



*श्री. दिलीप व सौ. दर्शना ठकार – शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती*

## SVJCT समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्यूटमधील इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे विविध अभ्यासक्रम – प्रा. डॉ. नेहा देशपांडे



राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० याविषयी सध्या वेगवेगळ्या माध्यमांवर सातत्याने चर्चा चालू आहे. या धोरणाची टप्प्याटप्प्याने शाळा महाविद्यालय आणि विद्यापीठांमध्ये अंमलबजावणी होताना दिसते आहे. आजवर पुढील पाच वर्षांसाठी शैक्षणिक योजना बनवत असंत. मात्र या नवीन धोरणांनुसार पुढील २५ वर्षांसाठीची दीर्घकालीन योजना आखण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांत आपल्याकडे साधन संपत्तीचा विकास झालेला आहे. परदेशी गुंतवणूक आपल्या देशात वाढीला लागली आहे आणि त्याद्वारे परकीय भांडवल आणि तंत्रज्ञान हे भारतात येत आहे आणि अजून येऊ घातले आहे.

हे बदलाचे वारे वाहत असताना हे योग्य की अयोग्य, याचा फायदा होतो की नाही याविषयी चर्चा करणे हा एक भाग झाला पण झपाट्याने येणाऱ्या नवीन तंत्रज्ञानाच्या लाटेवर स्वार होऊन नव्या जगाला गवसणी घालण्यासाठी तयारी करणे हा एक अत्यंत

महत्त्वाचा दुसरा भाग झाला. त्यासाठी आवश्यक ती शिक्षणप्रणाली निवडून त्यात कौशल्य प्राप्त करणे हे विद्यार्थी आणि पालकांसाठी एक आव्हान आहे.

आता विविध स्पर्धा परीक्षांचे निकाल हाती येत आहेत बारावीचा निकाल आणि स्पर्धा परीक्षांचे निकाल यांच्यावर अवलंबून विविध शाखांच्या आणि विषयांच्या प्रवेश फेऱ्या होत आहेत. या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रॉनिक सायन्स या विषयात असणाऱ्या वेगवेगळ्या संधी, नवनवीन अभ्यासक्रम आणि त्यांचा भारताच्या जडणघडणीतला मोठा वाटा याबद्दल जाणून घेऊ या.

आज आपण पाहतो की अगदी सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आपण अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा दैनंदिन जीवनात वापर करतो. अनेकदा हे जाणवते की ही उपकरणे आता निकड बनली असून हौसेची गोष्ट राहिलेली नाही.

या व्यतिरिक्तही शेती उद्योग, ऑटोमोबाईल्स, मोठमोठी यंत्रे, विमाने, जहाजे, संदेशवहन यंत्रणा, प्रचार-प्रसार माध्यमे आणि आरोग्य विषयक सेवा अशा सर्व ठिकाणी इलेक्ट्रॉनिक्स हा एक अत्यावश्यक भाग झालेला आहे. या सर्व ठिकाणी लागणारी सेमीकंडक्टर प्रणाली तयार होण्यासाठी आता भारतात उद्योग क्षेत्राने नव्या जोमाने तयारी केली आहे आणि यासाठी लागणार आहे ते कुशल मनुष्यबळ हे पुढील काळात आवश्यक ठरेल. याविषयीचा अभ्यास तसेच प्रत्यक्ष कार्यानुभव पुढील काळात महत्त्वाचा ठरेल. याबरोबरच AI, Industry 4.0(आता 5.0 येऊ घातले आहे), IOT अशा अद्ययावत तंत्रज्ञानासाठी शिक्षण व्यवस्था निर्माण होत आहे.

इलेक्ट्रॉनिक्स हा विषय कम्प्युटर सायन्सचा कणा असल्यामुळे त्या अभ्यासातही अत्यावश्यक ठरतो. तसेच सायबर सिक्युरिटी असो आयटी असो किंवा डेटा सायन्ससारखा झपाट्याने पुढे जाणारा विषय असो, सर्व अभ्यासात इलेक्ट्रॉनिक्सच्या अभ्यासाला महत्त्वाचे स्थान आहे.सध्या बीएससी इलेक्ट्रॉनिक्स, बीएससी कम्प्युटर सायन्स विथ इलेक्ट्रॉनिक्स, बीएससी डेटा सायन्स, बीएससी सीए असे विविध अभ्यासक्रम पुणे विद्यापीठाशी संलग्न तसेच स्वायत्त असलेल्या महाविद्यालयांमध्ये चालू आहेत.

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त श्री अशोकराव जोशी यांच्या प्रेरणेने आणि आशीर्वादाने अशा प्रकारच्या अभ्यासक्रमांचा विचार खूप आधी म्हणजे २०१३/१४ मध्येच सुरू झाला होता. त्याला अनुसरून, मुंबई विद्यापीठाच्या GICED या स्वायत्त शाखेकडून श्रीक्षेत्र डेरवण येथील SVJCT समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्यूटमध्ये सन २०१७मध्ये प्रथमच 'बी.एससी. बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन' हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. याच परिसरात असलेली संस्थेची शाळा, अटल लॅबमधील सुविधा, हॉस्पिटल तसेच मेडिकल कॉलेज या सर्वांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणे शक्य झाले. त्यांची कौशल्ये विकसित झाली. त्यामुळे दर वर्षी बाहेर पडणारे विद्यार्थी लीलावती, दीनानाथ अशी रुग्णालये आणि GEसारख्या उत्तम कंपन्यांमध्ये नोकरी मिळवत आहेत. आता M. Sc. सुद्धा सुरू झाले असून लवकरच संशोधन केंद्रपण कार्यरत होईल यात शंका नाही. या सर्व उभारणीमध्ये श्री विकासराव वालावलकर यांनी अनमोल मदत आणि मार्गदर्शन केले आहे. डायरेक्टर सौ. शरयू यशवंतराव, हेड ऑफ द डिपार्टमेंट प्रा. रोहन गुप्ते आणि M.Sc. in-charge प्रा. प्रज्ञा गोखले तसेच सर्व शिक्षकवर्ग मुलांना सतत प्रोत्साहन देऊन उत्तम काम करून घेत आहेत. श्री अशोकराव जोशी यांच्या द्रष्टेपणाचा हा प्रसाद अनेकांच्या आयुष्यात नवीन पहाट घेऊन आला आहे.

याबरोबरच पुणे विद्यापीठा अंतर्गत प्रथमच सध्या MES Abasaheb Garware महाविद्यालयामध्ये सुरू झालेला बी.एससी. बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन हा विषय आरोग्यविषयक सेवांमध्ये लागणारे तंत्रज्ञान शिकून विविध हॉस्पिटल, क्लिनिक्स, सर्विस इंडस्ट्री, रिसर्च इंडस्ट्री अशा ठिकाणी लागणारे मनुष्यबळ तयार करण्यासाठी तयार केला गेला आहे. विद्यार्थ्यांना वेळोवेळी नामांकित हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्ष काम करण्याची आणि शिकण्याची संधी मिळणार असल्यामुळे हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना भविष्यात उत्तम संधी प्राप्त करून देईल यात शंका नाही. या अभ्यासक्रमात पुणे आणि डेरवण येथे भविष्यात नवे उद्योजक घडवण्याची प्रक्रिया सामील केली जाईल आणि त्यातून भारतीय बनावटीची उपकरणे बनवणारे उद्योजक घडतील अशी आशा आहे.

सर्व विषयातील पदवीधारक विद्यार्थी पुढे पदव्युत्तर पदवी तसेच Ph.D. करू शकतील तसेच स्वतःचे उद्योग उभारून वेगळ्या वाटेवर यशस्वी होऊ शकतील.



*SVJCT समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्यूट - बी.एससी. बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन'चे प्रशिक्षणार्थी*

# उदयोन्मुख खेळाडूंचा एसव्हीजेसीटीच्या सिंथेटिक ट्रॅकवर कसून सराव

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलामध्ये एप्रिल व मे महिन्यात शालेय वार्षिक सुट्ट्यांचा सदुपयोग करण्यासाठी विविध खेळांच्या उन्हाळी क्रीडा शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक नामवंत प्रशिक्षक आपल्या संघांना घेऊन सरावासाठी आले होते. प्रामुख्याने ॲथलेटिक्स खेळासाठी ३५०हूनही अधिक खेळाडूंनी परिश्रमपूर्वक सराव केला. प्रशिक्षण शिबिरामध्ये मुंबई, ठाणे, डोंबिवली, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर अशा विविध जिल्ह्यांमधून खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

क्रीडासंकुलातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक ट्रॅकवर व व्यायाम शाळा, जलतरण या सुविधांचा लाभ घेण्यासाठी मुंबईतील नावाजलेल्या राईझिंग स्टार क्लबचे खेळाडू ॲथलेटिक्स प्रशिक्षण शिबिरासाठी उपस्थित होते. यामध्ये लक्ष्मी अरुरी, मेहली बोरावले, जान्हवी पाटील, श्रद्धा राजभर या राष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग होता. या क्रीडा शिबिराचे मार्गदर्शक योगेश साटम होते. या संकुलातील वातावरण हे खेळाडूंसाठी उत्तम असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ठाण्याहून आलेले ॲचिव्हर्स स्पोर्ट्स क्लबचे प्रशिक्षक निलेश पाटकर त्यांच्या खेळाडूंच्या संघासोबत महिनाभराच्या प्रशिक्षण शिबिरासाठी क्रीडा संकुलात दाखल झाले आहेत. त्यांच्या खेळाडूंसोबतच जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंनासुद्धा त्यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विविध शाळांमधील क्रीडा शिक्षकांसाठीही त्यांनी सात दिवसांची कार्यशाळा आयोजित केली ज्यामध्ये ॲथलेटिक्स या खेळांच्या नियमांमधील बदल प्रशिक्षणामधील नवीन तंत्रे याची नवीन माहिती क्रीडा शिक्षकांना दिली. ठाण्याहून आलेल्या संघामध्ये मिहिका सुर्वे, श्रेष्ठा शेट्टी, अथर्व भोईर, स्मित सरोदे असे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी झाले होते. ॲथलेटिक्स प्रशिक्षणासोबतच खेळाडूंना पूरक असे जलतरण, कबड्डी - खो खो मैदान, उत्तम निवास व भोजन व्यवस्था असल्यामुळे मुलांचा उत्तम सराव होतो, त्याचा फायदा नागपूर येथे संघटनेच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आमच्या खेळाडूंना होईल, असे मत निलेश पाटकर यांनी व्यक्त केले.

कल्याण व डोंबिवली येथून ॲथलेटिक्स खेळाडूंचा संघ घेऊन आलेले शिवरत्न ॲकॅडमीचे प्रशिक्षक जगदीश गावडे, अमोल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ५२ खेळाडूंसाठी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले. एसव्हीजसीटी क्रीडासंकुलातील अत्याधुनिक सुविधा खेळाडूंना अनुभवता आली आणि आगामी शालेय आणि संघटनेच्या स्पर्धांसाठीची तयारी आम्ही या शिबिरात केली, असेही त्यांनी सांगितले. याचबरोबर कराड येथील ज्येष्ठ ॲथलेटिक्स प्रशिक्षक कालिदास गुजर हेही आपला १८ खेळाडूंचा संघ घेऊन ५ दिवसाच्या प्रशिक्षणासाठी आले होते.





उन्हाळी शिबिरे





# आठव्या ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी स्पर्धेत मुलींमध्ये हरियाणा, मुलांमध्ये गोवा संघ विजेता

डेरवण येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या एसव्हीजेसीटी क्रीडा संकुलात दि. २८ ते ३० जून २०२४ या कालावधीत अॅमॅच्युअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने व महाराष्ट्र लगोरी संघटनेच्या वतीने आठवी ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी अजिंक्यपद स्पर्धा भव्य दिव्य स्वरूपात पार पडली. या स्पर्धेत भारतातील १७ राज्यातून १४ मुलांचे व १७ मुलींचे संघ अशा एकूण ५५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्घाटन भ.क.ल.वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयाचे पॅथॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. आर. एच. देशपांडे यांच्या हस्ते लगोरी फोडून करण्यात आले. या वेळी लगोरी फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संदीप गुरव, एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलाचे क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, लगोरी संघटनेचे पदाधिकारी अॅड. प्रिया गुरव, तुषार जाधव उपस्थित होते. तसेच सहभागी राज्यातील संघांनी संचलन करून मान्यवरांना मानवंदना दिली व खेळाडूंनी शपथ घेऊन स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

स्पर्धेत मुलांच्या गटात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात गोवा संघाने विजेतेपद पटकावले तर महाराष्ट्र संघ उपविजेते पदाचा मानकरी ठरला. बिहार व झारखंड संघाने तृतीय क्रमांक पटकावला. मुलांमध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार हरियाणामधील अमन कुमार या खेळाडूला देऊन गौरविण्यात आले.

मुलींमध्ये झालेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यामध्ये हरियाणा संघ सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपदाचा मानकरी संघ ठरला तर उपविजेतेपद गोवा संघाने मिळविले. तसेच तृतीय स्थान बिहार व उत्तराखंड संघाने पटकावले. मुलींमध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून बिहारमधील काजल या खेळाडूला गौरविण्यात आले.

याचबरोबर टार्गेट टीम लगोरी प्रकारात अरुणाचल प्रदेश विरुद्ध तामिळनाडू यांच्यामध्ये झालेल्या अंतिम सामन्यात अरुणाचल प्रदेश संघाने चमकदार कामगिरी करत अंतिम चषकावर नाव कोरले. तर तृतीय स्थान पाँडिचेरी संघाने पटकावले. मिक्स डबल क्रीडा प्रकारात झालेल्या अंतिम सामन्यात कर्नाटक संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद तर आसाम संघाने उपविजेतेपद पटकावले. दिल्ली संघाला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण मुख्य अतिथी म्हणून श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकास वालावलकर ह्यांच्या उपस्थितीत व भारतीय लगोरी संघटनेचे पदाधिकारी, बिहार लगोरी संघटनेचे रणदीर कुमार, हरियाणाचे सचिव जयवीर दुडी, आसामचे सचिव रितू, अरुणाचलप्रदेशचे सॅनडी चॅरी व सहभागी सर्व राज्यांचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. श्री. विकास वालावलकर हे आपल्या भाषणात म्हणाले की, ही भव्यदिव्य राष्ट्रीय लगोरी स्पर्धा बघून व भारतभरातील सहभागी २१ राज्ये बघून मी पूर्ण भारावून गेलो. मीही लहानपणी हा खेळ खेळायचो. आज हा खेळ संपूर्ण भारतात खेळला जातोय याचे कौतुक आणि आश्चर्य वाटत आहे. लगोरी हा खेळ शारीरिक संतुलन अबाधित राखण्यासाठी सर्वोत्तम असा नक्कीच आहे. आताच्या संगणकीय युगात अनेक पारंपरिक खेळ नामशेष होत चालले असताना लगोरीसारख्या देशी खेळाला कै. संतोष गुरव यांनी संजीवनी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे ही अभिमानास्पद गोष्ट आहे. पुन्हा कधीही आपण लगोरीच्या राज्य व राष्ट्रीय स्पर्धा येथे घ्या. आम्ही आपणांस आमच्या ट्रस्टच्या वतीने सर्वोतपरी सहकार्य करू अशी ग्वाही संदीप गुरव यांना दिली.



अपूर्व उत्साह आणि प्रतिसाद



श्री. विकास वालावलकर यांच्या हस्ते चषक स्वीकारताना विजेता हरियाणा मुलींचा संघ

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



*श्री. विकास वालावलकर यांच्या हस्ते चषक स्वीकारताना अरुणाचल प्रदेश मुलींचा संघ*



*आसामचा मुलींचा संघ*

# लहानग्या मल्लखांबपटूंचे शिबिर संपन्न

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात कोल्हापूर विभागस्तरीय मल्लखांब कौशल्य विकास प्रशिक्षण शिबिर दि. ११ ते १६ मे २०२४ या कालावधीत संपन्न झाले. या प्रशिक्षण शिबिरामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातील ३७ मल्लखांबपटूंनी सहभाग नोंदवला. शिबिर कालावधीत पुरलेला, टांगता व दोरीचा मल्लखांब प्रकारांचा सकाळ व सायंकाळच्या सत्रात सराव घेण्यात आला. हे शिबिर रत्नागिरी जिल्ह्याचे मुख्य प्रशिक्षक रणवीर सावंत, कोल्हापूर जिल्ह्याचे विशाल पाटील, वैभव हवालदार, गौरव आंब्रे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. याचबरोबर शिबिरातील सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या प्रशिक्षण शिबिराचा आराखडा मल्लखांब फेडरेशन ऑफ इंडियाचे माजी सचिव शिव-छत्रपती पुरस्कार विजेते श्री. सुजित शेडगे, रत्नागिरी जिल्हा मल्लखांब संघटनेचे सचिव शिव-छत्रपती पुरस्कारप्राप्त शांताराम जोशी, एसव्हीजेसीटी क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर आदी मंडळीनी तयार केला होता.




**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५, सहसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035